# प्रेस नोट

**जिल्हा निवड समिती, गडचिरोली अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली यांचे आस्थापनेवरील लिपीक टंकलेखक/ शिपाई** पदासाठी दिनांक 04.09.2016 रोजी घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेच्या अनुषंगाने निवड व प्रतिक्षा यादी तयार करण्याच्या दृष्टीने मुळ कागदपत्र/ प्रमाणपत्र / दस्ताऐवज तपासणी करण्याकरीता अर्हता प्राप्त ठरलेल्या उमेदवारांचे बैठक क्रमांक स्वतंत्ररित्या जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली च्या www.gadchiroli.nic.in व http://gadchiroli.govbharti.in/ या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत आले आहेत.

यास्तव, उपरोक्त यादीत ज्या उमेदवाराचे बैठक क्रमांक समाविष्ट आहेत, त्या सर्व उमेदवारांनी ऑनलाईन आवेदन पत्रात नमूद केल्याप्रमाणे त्यांचेकडील संपूर्ण मुळ प्रमाणपत्र/ कागदपत्र/ दस्तऐवज आणि त्याची एक साक्षंकित प्रत यासह प्रमाणपत्र तपासणी/ पडताळणी करीता **दिनांक 13 .10.2016 रोजी स. 11.00 वाजता, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली** येथे न चुकता उपस्थित रहावे. याबाबत, उपरोक्त यादीत समाविष्ट असलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या पत्त्यावर स्वतंत्र पत्राद्वारे (पोस्टाने) या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. पोस्टाच्या दिरंगाईमुळे वा अन्य कारणांने, सदरचे पत्र उमेदवारास वेळेत प्राप्त झाले नाही, तरीसुध्दा उमेदवारांनी या सुचनेच्या आधारे प्रमाणपत्र/ कागदपत्र/ दस्तऐवज तपासणी/ पडताळणी करीता न चुकता वेळेवर हजर रहावे. गैरहजर उमेदवारास अनुपस्थित दर्शवून बाद ठरविण्यांत येईल व पुढिल निवड प्रक्रियेत त्यांच्या नावाचा विचार केला जाणार नाही. तसेच अनुपस्थित उमेदवाराबाबत या कार्यालयाकडून नंतर कुठल्याही स्वरुपाचा पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि त्यांच्या कुठल्याही तक्रारीची नंतर दखल घेतल्या जाणार नाही.

उमेदवारांना फक्त प्रमाणपत्र/ दस्तऐवज पडताळणीकरीता बोलाविण्यात आलेले आहे. त्यामुळे, निवडीबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती तथा**
**जिल्हाधिकारी, गडचिरोली.**

**जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय.**
क्रमांक कार्या-२/आस्था-१/कावि-२७९० /१६.
दिनांक:- १०.१०.२०१६.

**प्रत:-** जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली यांना सर्व स्थानिक व प्रादेशिक वृत्तपत्रात तात्काळ प्रसिध्द करणेस्तव अग्रेषित.

**जिल्हाधिकारी, गडचिरोली.**

\\tsclient\E\Bharti.Cor.Lipik.2016.rtf